# प्रकरण सहावे

# उपसंहार

प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये एकूण पाच प्रकरणांमधून एस. एल. भैरप्पा यांच्या 'पर्व' या कादंबरीचा आपण सविस्तर अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणात अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष थोडक्यात नोंदवावयाचे आहेत.

**प्रकरण पहिले** 'मराठी अनुवादित कादंबरी : एक मागोवा' या प्रकरणामध्ये अनुवाद म्हणजे काय अनुवादाच्या व्याख्या, अनुवादाची परंपरा, अनुवादाचे स्वरूप, अनुवाद : शास्त्र की कला, अनुवादकाची भूमिका, अनुवादाचे महत्त्व, मराठी अनुवादित कादंबरीची संकल्पना, व्याख्या, अनुवादित कादंबरीची वाटचाल आणि अनुवादित कादंबरी: 'पर्व' इ. बाबीचा अभ्यास केला आहे.

अनुवादाचे विविध भाषेतील अभ्यासकांनी लावलेल्या अर्थाचा अभ्यास केला आहे आणि अनुवादाच्या विविध व्याख्यांचा आढावा घेतला. संस्कृत, मराठी, इंग्रजी या भाषांमध्ये अनुवादाचा घेतलेला वेध स्पष्ट केला आहे. अनुवादाची परंपरा शोधताना ज्ञानेश्वरांच्या कालखंडापर्यंत मागे जावे लागते. म्हणजेच अनुवादाची परंपरा प्राचीन असलेली दिसून येते. प्राचीन काळापासून आजवर अनुवादाचा झालेला विकास यातूनच अनुवादाची परंपरा किती समृद्ध आहे हे स्पष्ट होते. अनुवादाचे स्वरूप अभ्यास असताना भावना, अर्थ, विचार, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ आणि शैली यामध्ये सहजता असणे गरजेचे आहे. याचा आढावा आपण लक्षात घेतला. कलाकृतीचा अनुवाद करताना अनुवादकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्याच्या जवळ विशिष्ट प्रकारची संवेदनशीलता असणे गरजेचे आहे. अनुवादक हा प्रथम श्रेणीचा अस्वादक असायला हवा, कवीमनोवृत्तीचा हवा, त्याला दोन्ही भाषांचा आणि भाषांतील काव्यरूप अविष्कारांचा उच्चत्तम प्रतिचा जाणकार असावयास हवा याचा पहिल्या प्रकरणामध्ये आढावा घेतला आहे.

आज मराठी साहित्यात अनुवादाचे महत्त्व वाढलेले आहे असे पहावयास मिळते. मराठी साहित्यामध्ये अनुवादित कादंबरीची संकल्पना चांगली रूजली आहे. सर्व वाङ्मयप्रकारात समृद्ध असलेला वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहिले जाते. कादंबरीचे नेमके स्वरूप स्पष्ट करताना लक्ष्मणशास्त्री जोशी, भालचंद्र नेमाडे यासारख्या

अभ्यासकांच्या व्याख्यांचा आढावा घेतला. आणि मराठी साहित्यात अनुवादित कादंबरीची परंपरा कशी समृद्ध होत गेली हे पाहिले. त्याचप्रमाणे या प्रकरणात कन्नड, हिंदी, बंगाली, गुजराती, तमीळ या भारतीय भाषा तर इंग्रजी, फ्रेंच, रशियन, जर्मन यासारख्या पाश्चात्त्य भाषांतील कादंबरी वाङ्मय मराठीमध्ये कशा प्रकारे अनुवादित झाले याचा थोडक्यात अभ्यास केला. कन्नड साहित्याचा आणि मराठी साहित्याचा असलेला परस्पर संबंध हा घनिष्ठ स्वरूपाचा आहे. याची कल्पना एस. एल. भैरप्पा यांच्या साहित्यकृतीचा झालेला अनुवाद यावरून दिसून येते. एस. एल. भैरप्पा यांची 'पर्व' कादंबरी आणि कन्नड साहित्याचा थोडक्यात आढावा पहिल्या प्रकरणामध्ये घेतला आहे.

वरील सर्व मुद्यांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणामध्ये अनुवादाची वेगवेगळ्या अंगाने चर्चा केली आहे.

**प्रकरण दुसरे** 'मिथक : स्वरूप आणि संकल्पना' या दुसऱ्या प्रकरणामध्ये मिथक म्हणजे काय मिथकाची व्याख्या, मिथकांचे स्वरूप, भारतीय मिथकांची परंपरा, मिथक आणि प्रतिके, मिथक आणि इतर साहित्यशास्त्र, मिथक आणि भाषा, मिथक आणि साहित्य परस्पर संबंध, मिथक आणि मराठी साहित्य, मिथक आणि 'पर्व' इ. बाबीचा आढावा घेतला आहे.

मिथक म्हणजे काय हे स्पष्ट करताना वेगवेगळ्या अभ्यासकांनी मिथकांचे विविध अर्थ स्पष्ट केले आहेत. मिथकांच्या विविध व्याख्यांचा आढावा या ठिकाणी घेतला आहे. मिथक ही सार्वभौम संकल्पना आहे. तिला देश, काल यांच्या मर्यादा नसतात, तर त्या मानवाच्या सामूहिक आणि निरंतर अनुभूतीचे शब्दरूप आहेत. मिथकांचा आरंभ व वेगवेगळ्या रूपांचा निश्चित काळ नेहमी वादग्रस्त ठरतो. पण एक मात्र निश्चित की मानवी पिढ्यांचे तारतम्य मिथकांमध्ये व्यक्त होते. त्यामुळे मिथके ही प्रवाही राहतात हेच स्पष्ट होते. भारतीय व भारताबाहेरील संत विचारांना व प्रभावांना मुक्तपणे आणि सहजतेने स्वीकारत त्यांची केवळ स्तुती न करता ते आत्मसात करत मिथकांची परंपरा स्पष्ट होत गेली आहे. या बाबींचा आढावा याठिकाणी घेतला

आहे.

मिथक आणि इतर साहित्यशास्त्र यांचा संबंध सनातन स्वरूपाचा असलेला पहावयास मिळतो. मानसशास्त्र / मानववंशशास्त्र, धर्म, ललितकला यातून व्यक्त होणारी मिथके यांचे स्वरूप अभ्यासले. मिथक ही संकल्पना भाषेमध्ये चांगली रूळलेली दिसते. मिथकांचा साहित्यावर पडलेला प्रभाव हा प्राचीन काळापासून आजवर असलेला दिसून येतो. मिथक आणि मराठी साहित्य यामधून व्यक्त होणारी मिथके ही महत्त्वपूर्ण ठरलेली आहेत. काव्य, नाटक, कथा / कादंबरी यामधून साकार होणारी मिथके साहित्यात कशी वापरली जातात याचा अभ्यास केला आहे. 'पर्व' या भैरप्पांच्या कादंबरीमध्ये रूढ मिथकांचे लावलेले नवे अन्वयार्थ याचा आढावा घेतला. महाभारताचे आशयसूत्र घेऊन आलेली 'पर्व' मराठी साहित्यामध्ये कादंबरी क्षेत्रात सर्वार्थाने वेगळी ठरली आहे. या घटकांचा प्रस्तुत प्रकरणात आढावा घेतला आहे.

**प्रकरण तिसरे** 'पर्व' कादंबरीचे आशयसूत्र' महाभारतावर आधारलेली 'पर्व' या कादंबरीतून प्रकट होणाऱ्या चिंतनाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये केला आहे. 'पर्व' कादंबरीच्या केंद्रस्थानी 'युद्ध' या घटकाला ठेवून संपूर्ण कादंबरी या भोवती कशी फिरते याचे चित्रण केले आहे. एकूण चौदा विभागात विभागलेली कादंबरी आपल्या समोर साकार होताना वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून स्पष्ट होत जाते. मराठी साहित्यातील महाभारतावर आधारलेल्या रूढ आशयसूत्राला बाजूला सारून वास्तव रेखाटण्याचा एक लक्षणीय प्रयत्न भैरप्पांनी केला आहे.

**प्रकरण चौथे** महाभारत कथेतील महत्त्वाच्या आणि गौण अशा अनेक व्यक्तिरेखांचे भैरप्पांनी केलेले आकलन आणि त्यांचे व्यक्तिरेखाटन याचा परामर्श चौथ्या प्रकरणात आपण घेतला. महाभारत ही कथाच हजारो व्यक्तिरेखांना घेऊन आलेली विशाल कथा आहे. अनेक आशयसूत्रे त्यामध्ये सामावलेली आहेत. महाभारत कथेमध्ये विशिष्ट असा कोणी नायक असलेला पहावयास मिळत नाही. व्यासांनी ज्या व्यक्तिरेखा महाभारतात साकार केल्या आहेत. त्या सर्वसामान्य माणसांसारख्याच आहेत. आणि त्याच पार्श्वभूमीवर 'पर्व' कादंबरीतील व्यक्तिरेखा भैरप्पानी रेखाटल्या आहेत. अनेक

व्यक्तिरेखा प्रसंगानुरूप आलेल्या आहेत. या बाबींचा अभ्यास या ठिकाणी केला आहे.

महाभारत कथेमध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखा भीष्म, धर्म, भीम, अर्जुन, कर्ण, दुर्योधन, धृतराष्ट्र, कुंती, गांधारी, द्रौपदी या सारख्या अनेक आपल्यासमोर चित्रित होताना दिसतात. त्या साहित्यामध्ये येताना अनेक मिथके बरोबर घेऊन येतात. पण 'पर्व' कादंबरीमध्ये या व्यक्तिरेखा मानवी पातळीवर चित्रित होताना दिसून येतात. हा मानवी पातळीवर व्यक्तिरेखा उतरवण्याचा भैरप्पांचा प्रयत्न लक्षणीय ठरला आहे. कल्पिताला फाटा देऊन व्यक्तिरेखा मानवीय बनविण्याचा आणि मिथकांमध्ये न गुरफटता त्यांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न प्रस्तुत कादंबरीमध्ये केला आहे. 'पर्व' कादंबरीमध्ये साकार होणारी प्रत्येक व्यक्तिरेखा भूतकाळ आणि वर्तमानकाळ यामध्ये वावरताना भविष्यकाळाचा वेध घेत असल्याचे प्रखरतेने जाणवते. पौराणिक पण वास्तवादाला जवळ करणारी कादंबरी या सर्व व्यक्तिरेखांमुळे वेगळी ठरली आहे. व्यक्तिरेखांच्या जीवनात घडलेल्या अनेक घटनांचे दैवी रूप नाकारताना त्यांचे ऐतिहासिक, भौतिक, बद्धीसम्मत, तर्कसंगती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. देव मानलेल्या व्यक्ती या देव नसून माणसचं होती. हे भैरप्पा कादंबरीमध्ये स्पष्ट करतात. या सर्व मुद्यांचा परामर्श चौथ्या प्रकरणामध्ये घेतला आहे.

**प्रकरण पाचवे** ''पर्व' मधील मिथकांचे वेगळेपण' प्रस्तुत प्रकरणामध्ये परंपरागत, रूढ पौराणिक कादंबऱ्यामध्ये येणाऱ्या जीवन चित्रणापेक्षा वेगळे चित्रण प्रस्तुत कादंबरीमध्ये येते. याचा आढावा आपण घेतला आहे.

महाभारतातील कथा या आपल्यासारख्याच सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या माणसांच्या कथा आहेत. मात्र त्यावर अनेक प्रकारचे दैवीपणाचे कवच घातले आहे. ते कवच बाजूला सारून त्यातील निखळ वास्तवता काय आहे किंवा कशा प्रकारची असू शकेल हे 'पर्व' मध्ये साकारले आहे. पुराणांचे स्वरूप प्राप्त झालेल्या कथा या वास्तव पातळीवर आणून त्याचा सामाजिक अन्वयार्थ शोधता येतो. हे तत्त्व प्रस्तुत कादंबरीत पहावयास मिळते. कल्पिताला वास्तवाचा आकार देऊन एक सामाजिक,

अन्वयार्थ लावला गेला आहे हे पखरतेने जाणवेते. आणि हेच 'पर्व' कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये ठरले आहे. आशयाच्या आणि विषयाच्या दृष्टिने पूर्णपणे वेगळी ठरलेली कादंबरी परंपरागत निर्माण झालेल्या आशयसूत्राला वेगळे करून वास्तवाचे आयाम प्रस्तुत कादंबरीत उतरताना दिसतात.

जीवन चिंतनाचे वेगळेपण, कानीन संतती, नियोग प्रथा, बहुपतीत्त्व आणि बहुपत्नीत्त्व प्रथा, पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध, युद्धानंतरची भीषणता, मृत्यूचे विदारक चित्रण या सर्व घटकांमधून मिथकांचे वेगळेपण स्पष्ट होते. त्याचबरोबर 'पर्व' मधील वाङ्मयीन वेगळेपण हे मिथकांच्या आधारे व्यक्त झाले आहे. ते वाङ्मयीन दृष्टिकोन, महाभारताच्या विशाल पटलावर एकवटलेले आशयसूत्र, 'पर्व' मधील वातावरण, 'पर्व' मधील घटनाप्रसंग, संवाद, निवेदनशैली या मुद्यांतून स्पष्ट होते. महाभारतकालीन अस्तित्वात असणाऱ्या अनेक घटकांचे चित्रण कादंबरीमध्ये प्रकट झाले आहे. या सर्व येतत विषयक चर्चा पाचव्या प्रकरणात आपण केले.

या सर्व प्रकरणामधून असे दिसून येते की,

- मराठी साहित्यामध्ये असलेले अनुवादाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे हे स्पष्ट होते.
- मिथाकांचा साहित्यामध्ये केलेला वापर हा अनेक घटनाप्रसंगाना, मध्यवर्ती ठेवून झालेला आहे तसेच मिथकांचे साहित्यातील स्थान हे चिरंतर स्वरूपाचे आहे हे स्पष्ट होते.
- भैरप्पा यांनी 'पर्व' कादंबरीमध्ये घटना प्रसंगाची संगती लावताना शाप - वर, योगायोग, चमत्कार या अमानवी, अलौकिक गोष्टींना नाकारून त्यांचा मानवी पातळीवर अर्थ शोधला आहे.
- 'पर्व' ही कादंबरी महाभारतातील कोणत्याही व्यक्तिरेखेला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली नाही, तर कुरूक्षेत्राच्या युद्धभूमीला मध्यवर्ती ठेवून कल्पित आणि पौराणिक अवरणे बाजूला करून कादंबरीची रचना केली आहे.

- ऐतिहासिक वास्तवता आणि नैतिक समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'पर्व' चे आकलन केले.

- 'पर्व' कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखांचा शेवट हा अतिशय करूण झाला आहे. त्यातून जीवनविषयाचे वैय्यर्थ्य लेखकाला सूचित करावयाचे आहे असे वाटत राहते.

- मानवी जीवनातील तीन महत्त्वाच्या घटकांचे चित्रण 'पर्व' मध्ये करण्याचा प्रयत्न भैरप्पांचा आहे. ते म्हणजे वासना, युद्ध आणि मृत्यू हे स्पष्ट होते.

- 'संभोग' आणि 'संबंध' ह्यांचे नाते शोधण्याचा आणि मानवी नाती कोणत्या अर्थांनी उलगडली जातात याचा शोध ही कादंबरी घेते.

- महाभारतातील व्यक्तिमत्वे व घटना तत्कालीन परिस्थिती यांचा कलात्मकतेने सर्जनशील प्रतिभा कसा उपयोग करून घेते याचा प्रत्यय प्रस्तुत कादंबरीमधून येतो.

- महाभारताची कथाच इतकी व्यापक आणि गुंतागुंतीची आहे की अनेक व्यक्तिंना आणि प्रसंगांना भैरप्पांनी काही नवी रूपे, नवे अर्थ, नव्या मर्मदृष्टी दिल्या आहेत हे स्पष्ट होते

या मुद्यांच्या आधारे 'पर्व' मध्ये लावलेला मिथकांचा नवा अन्वय आपल्या समोर स्पष्ट होतो. अशा प्रकारे वरील प्रकरण रचनांच्या अनुषंगाने 'पर्व' कादंबरीचा अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये केला आहे.

# संदर्भ सूची

## साधन सूची


१. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व'

भावानुवाद : कुलकर्णी, उमा

मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,

आवृत्ती पाचवी, २००६ पुनर्मुद्रण २००७

## संदर्भ सूची


१. कऱ्हाडे, सदा : 'भाषांतर', लोकवाङ्मय ग्रह मुंबई, आवृत्ती दुसरी १९८९.

२. काळे, कल्याण, सोमण, अंजली (संपा) : 'भाषांतरमीमांसा', प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७.

३. कुलकर्णी अनिरूद्ध (संपा) : 'प्रदक्षिणा - खंड १' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, आवृत्ती सातवी १९८०.

४. कुलकर्णी, अनिरूद्ध (संपा) : 'प्रदक्षिणा - खंड २', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, आवृत्ती २००२.

५. कुलकर्णी, गो. म. कुलकर्णी व. दि. : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड - ६ भाग - १' महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, आवृत्ती पहिली १९८८.

६. कुलकर्णी, व. दि. : 'मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक', पद्मगंधा प्रकाशन- पुणे, आवृत्ती पहिली १९९७.

७. कुलकर्णी, श्री. म : 'कादंबरी रचना,' उनेष प्रकाशन नागपूर, आवृत्ती पहिली १९५६.

८. खोले, विलास (संपा) : 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मय ग्रह मुंबई, आवृत्ती पहिली २००२.

९. खैरे, विश्वनाथ : 'भारतीय मिथ्याचा मागोवा', समंत प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९८६.

१०. खैरे, विश्वनाथ : 'साहित्य मिथ्य माहित्य', समंत प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २०००.

११. गायकवाड, बाबुराव : 'साहित्य वैभव' (अनुवादित लेखसंग्रह), श्री समर्थ साई वितरण पुणे, आवृत्ती पहिली १९९७.

१२. चव्हाण, अर्जुन : 'अनुवाद चिंतन', अमन प्रकाशन कानपूर आवृत्ती पहिली १९९८.

१३. जोग, रा. श्री. : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास १८७५ ते १९२० खंड ५ भाग १' महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, आवृत्ती पहिली १९७३.

१४. जोग, ल. ग. : 'कादंबरी - महाराष्ट्रातील वाङ्मयीन प्रवाह', चिरंजीव ग्रंथ प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९६३.

१५. जोशी, प्र.न. : 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास' प्रसाद प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९७९.

१६. टिळक, विद्यागौरी, शहा, मृणालिनी (संपा) : 'भैरप्पांचे कादंबरी विश्व', चंद्रकला प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००७.

१७. देशपांडे, अ. ना. : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग २ १९२० ते १९५०', व्हीनस प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९५९ पुनर्मुद्रण - १९७९.

१८. देशपांडे, कुसुमावती : 'मराठी कादंबरीचे पहिले शतक १८५०-१९५०', मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई, आवृत्ती दुसरी १९७५.

१९. देशपांडे, बालशंकर : 'कादंबरी : विवेचन आणि विश्लेषण', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पहिली १९९८.

२०. नगेन्द्र : 'मिथक और साहित्य', नेशनल पब्लिशिंग हाऊस नयी दिल्ली, आवृत्ती दुसरी १९८७.

२१. नाईक, राजीव : 'नाटकातलं मिथक', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४.

२२. नेमाडे, भालचंद्र : 'टीकास्वयंवर' , संकेत प्रकाशन औरंगाबाद आवृत्ती पहिली १९९०

२३. पवार, गो. म, हातकणंगलेकर, म.द. (संपा) : 'मराठी साहित्य: प्रेरणा आणि स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती पहिली १९५६.

२४. प्रभुणे, अरूण : 'पौराणिक नाटक : नवा अन्वयार्थ', प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७.

२५. फाटक, म. वि., ठकार, रजनी : 'भाषांतर शास्त्र की कला', वरदा बुक्स पुणे, आवृत्ती पहिली १९८७.

२६. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास १९२०-१९४७, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती दुसरी १९९६.

२७. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'देशीवाणा', अक्षर प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली २००२.

२८. बापट, प्र. वा, गोडबोले, ना. वा : 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन पुणे आवृत्ती दुसरी १९७५.

२९. बिरासदार, वसंत : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ. स. १८१८ ते १९९९ पर्यंत)', कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९९९.

३०. भवाळकर, तारा : 'मिथक आणि नाटक', सविता प्रकाशन आवृत्ती पहिली १९८८.

३१. भागवत, दुर्गा: 'लोसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई आवृत्ती पहिली १९५६

३२. रानडे, प्रतिभा : 'ऐस. पैस गप्पा : दुर्गांबाईंशी', राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९८

३३. राठी, निलम : 'साठोत्तरी हिंदी नाटक', संजय प्रकाशन दिल्ली, आवृत्ती पहिली २००१.

३४. विद्यावाचस्पती, उषापूरी : 'मिथक उद्भव और विकास तथा हिंदी साहित्य', नेशनल पब्लिशिंग हाऊस, नयी दिल्ली, आवृत्ती पहिली १९९६

३५. शंभूनाथ : 'मिथक और आधुनिक कविता', नेशनल पब्लिशिंग हाऊस नयी दिल्ली, आवृत्ती पहिली १९८५

३६. शहा, मुं.ब. (संपा) : 'मिथक आणि मराठी साहित्य', का. स. वाणी मराठी प्रगत अध्यन संस्था धुळे, आवृत्ती पहिली २००३

## कोशसूची

१. गणोरकर, प्रभा व इतर (संपा ) : 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,' ग. र. भटकळ फाऊन्डेशन मुंबई, आवृत्ती पहिली २००१.

२. जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा) : 'मराठी विश्वकोश खंड ३', महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली १९७६.

३. जोशी,लक्ष्मणशास्त्री (संपा) : 'मराठी विश्वकोश खंड १२', महाराष्ट्रराज्य मराठी शब्दकोश निर्मित मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली १९८५.

४. राजाध्याक्ष, विजया (संपा) : 'मराठी वाङ्मयकोश खंड ४', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली २००२.

## नियतकालिके सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पंचधारा | - | जाने - जुन १९८९ |
| २. | पंचधारा | - | एप्रिल - सप्टेंबर १९९२ |
| ३. | पंचधारा | - | जुलै - सप्टेंबर १९९८ |
| ४. | पंचधारा | - | एप्रिल - जुन - जुलै - सप्टेंबर २००७ |
| ५. | पंचधारा | - | जाने - मार्च २००२ |
| ६. | युगवाणी | - | डिसें १९९१ |
| ७. | युगवाणी | - | जाने २००२ |
| ८. | सत्यकथा | - | नोंव्हे १९६० |
| ९. | सत्यकथा | - | ऑगस्ट १९७१ |
| १०. | सत्यकथा | - | सप्टें १९७४ |
| ११. | प्रतिष्ठान | - | जाने १९७५ |
| १२. | प्रतिष्ठान | - | जाने १९८१ |
| १३. | अनुष्टुभ | - | मार्च - एप्रिल २००३ |
| १४. | नवभारत | - | ऑक्टो - नोंव्हे १९५६ |
| १५. | नवभारत | - | में १९८० |
| १६. | नवभारत | - | जानेवारी १९८३ |
| १७. | नवभारत | - | ऑगस्ट १९८३ ऑक्टो - नोंव्हे १९८५ |
| १८. | नवभारत | - | फेब्रु २००० |
| १९. | नवभारत | - | मार्च २००० |
| २०. | नवभारत | - | जून २००१ |
| २१. | महाराष्ट्र साहित्य पत्रिका | - | ऑक्टोंबर - डिसेंबर १९६५ |
| २२. | महाराष्ट्र साहित्य पत्रिका | - | जानेवारी - मार्च १९६६ |
| २३. | महाराष्ट्र साहित्य पत्रिका | - | एप्रिल - जून २००४ |
| २४. | पत्रक | - | |
| | महाराष्ट्र टाईम्स | - | ३१ मार्च १९९१ पृ. ६ |